**ठळक बातम्या**

- ऑस्ट्रेलिया आणि भारताच्या संरक्षण सहकार्याविषयीचं निवेदन जारी

- चालू आर्थिक वर्षासाठी भारताचा स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ७ टक्के राहण्याचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अंदाज

- अमेरिकेकडून इराणवर पुन्हा हवाई हल्ले/ प्रत्युत्तरादाखल बहरीन, कुवेत, कतारवर क्षेपणास्त्र हल्ले केल्याचा इराणचा दावा

- अमेरिका - इराण संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या दरात ६ टक्क्यांनी वाढ

**आणि**

- विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या कनिष्ठ गटात भारताच्या अर्णव पापरकर याची उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियाची द्विपक्षीय भागीदारी भविष्यासाठीचं एक भक्कम नातं असून आर्थिक आणि व्यापारविषयक एकात्मतेला मिळालेली गती हे या चर्चेचं यश असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बनीज यांनी दोन्ही देशांमधल्या संरक्षण सहकार्याबाबतचं संयुक्त निवेदन जारी केलं, त्यावेळी ते बोलत होते. ऑस्ट्रेलियात मेलबर्न इथे दोन्ही नेत्यांची आज बैठक झाली त्यानंतर हे निवेदन देण्यात आलं. भारत आणि ऑस्ट्रेलिया या देशांमधल्या सामायिक घटकांवर प्रधानमंत्री म्हणाले…

**- - होल्ड… बाईट - प्रधानमंत्री - -**

दोन्ही देशांमध्ये २०२२ साली झालेला आर्थिक आणि व्यापारी सहकार्य करार विक्रमी वेळेत लागू झाल्यानंतर भारतातून ऑस्ट्रेलियाला होणारी निर्यात दुप्पट झाल्याचं यावेळी मोदी यांनी सांगितलं. हिंद प्रशांत क्षेत्रात शांतता, स्थैर्य आणि प्रगती साध्य करण्यासाठी दोन्ही देशांमध्ये सहकार्य आवश्यक आहे असं प्रधानमंत्री मोदी यांनी म्हटलं आहे. ते बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलत होते.

भारत-ऑस्ट्रेलिया सागरी सुरक्षा सहकार्य कृती आराखड्याद्वारे दोन्ही देशांमधील सागरी सहकार्य वाढवण्याचा निर्णय झाल्याचं या निवेदनातून जाहीर करण्यात आलं. भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी आणि स्वच्छ ऊर्जा उद्दिष्ट पूर्ततेसाठी ऑस्ट्रेलियातून भारताला दीर्घकालीन युरेनियम पुरवठा करण्याचा महत्वाचा करारही यावेळी अंतिम करण्यात आला आहे. तसंच दोन्ही देशांमधल्या उद्योजकांना जोडणारी संरक्षण उद्योग नवोपक्रम मार्गिका निर्माण करण्याची घोषणा या निवेदनात करण्यात आली आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने चालू आर्थिक वर्षासाठी भारताचा स्थूल राष्ट्रीय उत्पादनवाढीचा दर ७ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यानुसार भारताची अर्थव्यवस्था जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरली आहे. नाणेनिधीने काल जारी केलेला अर्धवार्षिक अहवाल- वर्ल्ड इकोनॉमिक आउटलुक मध्ये ही आकडेवारी दिली आहे. अहवालानुसार भारताची देशांतर्गत बाजारपेठ मजबूत असून सेवा क्षेत्राच्या गतिमान वाढीमुळे भारताला हा विकासदर गाठता आला आहे. भारताचा हा अंदाजित विकासदर जागतिक स्तरावरच्या अंदाजित विकासदराच्या दुपटीहून अधिक आहे. अहवालात जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीचा यावर्षीचा अंदाजित दर ३ टक्के दिला आहे.

स्थूल राष्ट्रीय उत्पादनात भारताच्या खालोखाल चीनचा क्रमांक असून तिसऱ्या क्रमांकावर अमेरिका आहे. या अहवालानुसार पुढच्या वर्षी भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ६ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे.

<><><><><>

ओदिशामध्ये भारताच्या सागरी सीमेबाहेरच्या मस्त्यसंपदेच्या शाश्वत वापराच्या उपक्रमाचा प्रारंभ आज उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी केला. भुवनेश्वरमधल्या ओदिशा कृषी आणि तंत्रज्ञान विद्यापीठात हा कार्यक्रम झाला. नील अर्थव्यवस्था ही देशाच्या समृद्धीची गुरुकिल्ली असल्याचं त्यांनी या कार्यक्रमात सांगितलं. भारताची सागरी खाद्यपदार्थ निर्यात ७३ हजार कोटी रुपयांवरून अधिक झाली असून भारतातून १२० देशांना निर्यात केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. युवकांनी आधुनिक तंत्रज्ञान आधारित मस्त्यव्यवसाय आणि सागरी क्षेत्रातल्या व्यवसायांचा स्वीकार करून विकसित भारत घडवण्यात योगदान द्यावं असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेअंतर्गत ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्यांच्या तिसऱ्या बैठकीचं उद्घाटन आज केंद्रीय परिवहन सचिव व्ही .उमाशंकर यांच्या हस्ते झालं.

उद्घाटनानंतर परिवहन कार्य गटाच्या एका सत्राला उमाशंकर यांनी संबंधोधित केलं. यावेळी पुनर्वापर, गतीशीलता, शहरी पायाभूत सुविधा, शाश्वत विकास या मुख्य मुद्द्यांवर तसंच परिवहन क्षेत्राशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान ब्रिक्स सदस्य देशांच्या परिवहन मंत्र्यांची मुख्य बैठक येत्या ११ आणि १२ जुलै रोजी होणार आहे. केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. दोन दिवस चालणाऱ्या या बैठकीत ब्रिक्स सदस्य देशांचे परिवहन मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार असून परिवहन, पायाभूत सुविधा आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे.

<><><><><>

राज्यात समान नागरी कायदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली ७ जणांची समिती स्थापन केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. या समितीने ६ महिन्यांत अहवाल द्यावा आणि नागपूर इथं होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायदा आणायचा प्रयत्न करू, असंही त्यांनी सांगितलं. या समितीत मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, न्यायमूर्ती एस. जी. मेहरे, राज्याचे माजी मुख्य सचिव डी. के. जैन, मुख्य महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, पद्मश्री आणि राज्यघटनेचे अभ्यासक रमेश पतंगे, शिक्षणतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा रावल यांचाही या समितीत समावेश आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी अफझलखान भेटीच्या वेळी त्याचा अंगरक्षक सय्यद बंडा याचा वार रोखून छत्रपतींचं रक्षण करणारे वीर जिवाजी महाले यांचं स्मारक उभारण्यासाठी पहिल्या टप्प्यात एक कोटी रुपये मंजूर केल्याची घोषणा मंत्री शंभुराज देसाई यांनी केली.

मुंबई उपनगरात खारफुटी असलेल्या ठिकाणी भराव टाकून राहणाऱ्यांचं सर्वेक्षण करू आणि 1 जानेवारी 2011 पर्यंत तिथं राहणाऱ्यांचं पूर्ण पुनर्वसन करू, असं आश्वासन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिलं.

<><><><><>

अमेरिकेने आज सकाळी इराणवर पुन्हा एकदा हवाई हल्ले केले. या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने बहरीन, कुवेत, कतारवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केल्याचा दावा केला आहे. या नव्या संघर्षामुळे पर्शियन आखातातील युद्ध थांबवण्यासाठी केलेल्या तात्पुरत्या युद्धविराम कराराला मोठा धक्का बसला आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजांवर इराणने हल्ले केल्यानं युद्धविराम संपुष्टात आल्याचे संकेत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच दिले होते. त्यानंतर आज पहाटे अमेरिकेने इराणमधील ९० ठिकाणांवर हवाई हल्ले केले. त्यात लष्करी तळ आणि बंदरांवरील सुविधा केंद्रांचा समावेश आहे.

बुशेहरसह अनेक ठिकाणी स्फोट झाल्याचे वृत्त इराणच्या सरकारी माध्यमांनी दिलं आहे. बुशेहर इथं इराणचा अणुऊर्जा प्रकल्प आहे. तसंच चाबहार, कोनारक, बंदर अब्बास आणि सिरिक या दक्षिणेकडील बंदर शहरांतही स्फोट झाल्याचे वृत्त आहे.

<><><><><>

अमेरिका-इराण संघर्ष तीव्र झाल्याने जागतिक बाजारपेठांवर त्याचे पडसाद उमटले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतचा युद्धविराम संपुष्टात आल्याचे म्हटले आहे. या घडामोडीनंतर ब्रेंट क्रूडच्या किमतीत सहा टक्क्यांहून अधिक वाढ होऊन प्रति बॅरल ७८ डॉलर्स ८० सेंटपर्यंत पोहोचले आहेत. तर अमेरिकन कच्च्या तेलाच्या दरातही वाढ होऊन ते प्रति बॅरल ७५ डॉलर पर्यंत गेले आहेत. तेलाच्या किमती वाढल्याने महागाई आणि जागतिक अर्थव्यवस्थेबाबतची चिंता पुन्हा वाढली आहे.

युरोप, अमेरिका आणि आशियातील बहुतांश शेअर बाजारांत घसरण झाली असून, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील तंत्रज्ञान कंपन्यांच्या समभागांची मोठी विक्री झाली.

<><><><><>

भारताचा १८ वर्षीय टेनिसपटू अर्णव पापरकर याने विम्बल्डन कनिष्ठ गटातल्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश करून इतिहास घडवला आहे. गेल्या ३६ वर्षात पुरुष एकेरी गटात इथवर पोचणारा तो भारताचा पहिला खेळाडू आहे. अर्णवने उपउपांत्य फेरीत जपानच्या रयो ताबाता याचा फक्त ५२ मिनिटांमध्ये ६-२, ६-१ असा पराभव केला. त्याआधी पहिल्या फेरीत त्याने ब्रिटनच्या जोशुआ क्रेज याला आणि दुसऱ्या फेरीत अमेरिकेच्या किटन हॅन्स यालाही

दोन सेट मध्येच  हरवलं होत. या स्पर्धेत अर्णवने आतापर्यंत एकही सेट गमावलेला नाही. त्याचा पुढचा सामना आज संध्याकाळी ५ वाजता अमेरिकेच्या जॉर्डन ली याच्याबरोबर होणार आहे.

//<><><><><>//